अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

जा.क्र.अम / सका - ०९/ २०१३.
महानगरपालिका सचिव कार्यालय.
दिनांक : २४ -०१-२०१३.

अहमदनगर महानगरपालिकेच्या खास सभेची सुचना.

( मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण २ - नियम क्र. १ (ड) अन्वये.)
सभा सुचना क्रमांक ०९ , दिनांक ३०-०१-२०१३.

प्रति,
सन्मा.श्री. / श्रीमती..............................................................

सदस्य,
अहमदनगर महानगरपालिका,
अहमदनगर.

महोदय,

यांस-

याद्वारे कळविण्यांत येते की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण २ - नियम क्र. १ (ड) अन्वये मा.महापौर यांनी अहमदनगर महानगरपालिकेची खास सभा **बुधवार दिनांक ३०-०१-२०१३ रोजी दुपारी १.०० वाजता माळीवाडा येथील "जुने महानगरपालिका सभागृहात "** सोबतच्या विषय पत्रिकेतील कामकाज चालविण्यांसाठी आयोजित केली आहे.

आपणांस सभेस उपस्थित राहण्यांची विनंती करण्यांत येत आहे.

सोबत : १. विषय सूची.
२. प्रस्तावाची टिप्पणी.

प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

सभा क्रमांक ०८ बुधवार दिनांक ३० / ०१ /२०१३ रोजी दुपारी १.०० वाजता होणा-या
मा.खास सभेची विषय पत्रिका.
---*---

| **विषय क्र.** | **विषय** |
|---|---|
| ४२ | मा.केंद्रशासित UIDSSMT योजने अंतर्गत मंजूर असलेल्या (१) सावेडी भुयारी गटार योजना व (२) केडगांव/सारसनगर भुयारी गटार योजना या योजनांचे प्रकल्प अहवाल चालू दरसुचीप्रमाणे मा.शासनास पुर्नःसादर करणे असता, वाढीव रक्कमेचा महासभेचा ठराव करणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ४३ | मा.सदस्य यांचे रजेचे अर्ज. |

मा.महापौर सो, यांचे मान्यतेने.
दिनांक : २४ / ०१ /२०१३.

प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक : ४२** **दिनांक : ३०/०१/२०१३**

---

**प्रस्तावाचा विषय :** मा.केंद्रशासित UIDSSMT योजने अंतर्गत मंजूर असलेल्या (१) सावेडी भुयारी गटार योजना व (२) केडगांव/सारसनगर भुयारी गटार योजना या योजनांचे प्रकल्प अहवाल चालू दरसुचीप्रमाणे मा.शासनास पुर्न:सादर करणे असता, वाढीव रक्कमेचा महासभेचा ठराव करणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

--**--

**प्रस्तावाचा मजकुर :-**

संदर्भ :- १) मा.प्रधान सचिव, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी त्यांचेकडे दिनांक ०८/०१/२०१३ रोजी होणा-या आढावा बैठकीपूर्वी मा.आयुक्त यांना दिलेले निर्देश.
२) मा.उपसंचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, मुंबई यांचे मा.मुख्य अभियंता,म.जी.प्रा.पुणे यांना निर्देशित पत्र क्र.नपप्रस/ UIDSSMT/ अहमदनगर/ २०१३/कक्ष-१३ दिनांक ०८/०१/२०१३

अहमदनगर महानगरपालिकेमार्फत १) सावेडी भुयारी गटार योजना व २) केडगाव भुयारी गटार योजना या योजना मा.केंद्र शासनाच्या UIDSSMT योजनेअंतर्गत सादर करण्यात आल्या असता सदर योजनांना मा.राज्य शासनाच्या अनुक्रमे ६ व्या व ८ व्या SLSC मिटींगमध्ये अनुक्रमे रू.६४.४५७ कोटी व रू. ६३.२०४ कोटीच्या रक्कमेस मान्यता प्राप्त झालेली असून सदर योजना निधी प्राप्तीसाठी मा.केंद्रशासनाकडे प्रलंबीत आहेत.

या संदर्भात मा.प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी महानगरपालिकेस या दोनही योजनांचे प्रकल्प अहवाल चालू दरसुचीनुसार नव्याने मा.शासनास सादर करणे बाबत निर्देश दिले या योजनेचे प्रकल्प अहवाल तयार करणारी एजन्सी मे.सॉलीड कोअर कन्सलटंट प्रा.लि., लातूर यांचेमार्फत त्या योजनेचे सन २०१२-२०१३ चे दरसुचीप्रमाणे सुधारीत प्रकल्प अहवाल प्राप्त करून घेण्यात आले. या दोनही योजनांचे सुधारीत सविस्तर प्रकल्प अहवालाचे मा.मुख्य अभियंता, म.जी.प्रा. पुणे यांचेकडून तांत्रिक मुल्यांकन करून घेवून या योजनांचे सादरीकरण दि. १५/०१/२०१३ रोजी झालेल्या SLSC च्या १६ व्या बैठकीमध्ये करण्यात आले असता सदरहू कमेटीने खालीलप्रमाणे रक्कमेस मंजूरी दिलेली आहे.

१) सावेडी भुयारी गटार योजना - १००.४९५ कोटी
२) केडगाव भुयारी गटार योजना - ८२.२८७ कोटी

वरील नमूद दोनही योजनांचे सुधारीत सविस्तर प्रकल्प अहवालास मा.शासनाकडून मंजूरी दिलेली असून याकामी मा.राज्य शासनाशी करारनामा करावयाचा आहे. सदरचा करारनामा करताना

१) वाढीव रक्कमेस म.न.पा.ची मान्यता
२) प्रकल्प अहवालाच्या १०% रक्कम म.न.पा. निधीतून अथवा वित्तीय संस्थेकडून कर्ज उभारून खर्च करणे
३) म.न.पा. ठराव क्र. ५ दि. २१/०७/२००७ अन्वये मा.शासनाशी निगडीत तसेच म.न.पा. स्तरावरील सुधारणा राबविणे

या आशयाचा मा.महासभेचा ठराव अभिप्रेत आहे.

मा.केंद्रशासित UIDSSMT योजनेअंतर्गत चालू दरसुचीनुसार मा.शासनास सादर करण्यात आलेल्या १) सावेडी भुयारी गटार योजना व २) केडगाव/सारसनगर भुयारी गटार योजनेचे ' वाढीव खर्चास मा.सर्वसाधारण सभेची मंजूरी घेवून पारीत ठराव मा.शासनास त्वरीत सादर करणे आवश्यक आहे. जेणेकरून सदरच्या दोनही योजनेसाठी मा.शासनाकडून लवकरात अनुदान मिळून सदरच्या योजना मार्गी लागतील.

तरी वरीलप्रमाणे भुयारी गटार योजनाचे सन २०१२-२०१३ चे सुधारीत दरसुचीनुसार मा.शासनास सादर केलेल्या प्रस्तावाचे वाढीव खर्चास मा.सर्वसाधारण सभेची मंजूरी मिळणेस्तव ऑफिस रिपोर्ट सविनय सादर.

यावर मेकॅनिकल इंजिनियर यांचा अभिप्राय की, अहवालानुसार मा.महासभेच्या मंजूरीस्तव सादर.

यावर उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, अहवालानुसार मा.महासभेपुढे विषय निर्णयास्तव ठेवणेस मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब, यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

यावर मा.महापौर साहेब यांचा अभिप्राय की, मा.सदस्य स्थायी समिती यांनी दिलेल्या पत्रानुसार सदर विषयाबाबत खास सभा बोलाविणेत यावी. दिनांक ३०/०१/२०१३ रोजी दुपारी १.०० वाजता खास सभा बोलवावी.

अशा बाबतचा प्रस्ताव मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, उपायुक्त (सा), मेकॅनिकल इंजिनियर यांच्या अभिप्रायासह मा.महासभेपुढे ठेविला.

---*---

**चर्चा :-**

**मा.श्री.संभाजी कदम :-** या योजने संदर्भात कोणकोणते भाग येतात, कोणत्या भागात जाणार आहे. केडगांवच्या योजनेत कोणते भाग येतात, केडगांव मधील पूर्ण भाग वाचून दाखवा.

**मा.श्री.संग्राम जगताप :-** बोल्हेगांव मधील ४०० ते ५०० घरे नव्याने झाली आहेत त्यांचाही सर्व्हे मध्ये समावेश करण्यांत यावा.

**मा.श्री.अशोक बडे :-** या योजनेमध्ये बोल्हेगाव व नागापुरचाही समावेश करणेंत यावा. ठराव मंजूर करणेत यावा.

**मा.श्री.दिलीप सातपुते :-** ठराव मंजूर करण्यांत यावा.

**श्री.निकम मेकॅनिकल इंजिनियर :-** सावेडी भुयारी गटार योजना व केडगांव/सारसनगर भुयारी गटार योजना मा.शासनास सादर केल्या. सावेडी भुयारी गटार योजनेत समाविष्ट भाग वाचून दाखविण्यात आला. दुस-या योजनेच्या भागाची देखिल माहिती देण्यांत आली.

**मा.श्री.संग्राम जगताप :-** शांती नगर परिसराचा समावेश नाही तो करण्यांत यावा.

**मा.श्री.संभाजी कदम :-** यापुर्वी सर्व्हेमध्ये एखादा भाग समाविष्ट केला नसेल तर तो वर्किंग सर्व्हे मध्ये समावेश करण्यांत यावा.

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे :-** ठराव मंजूर करावा.

**मा.श्री.निखिल वारे :-** मा.शासनाकडे हि योजना केंव्हा सादर केली.

**श्री.निकम मेकॅनिकल इंजिनियर :-** दिनांक १२/०८/२००९ रोजी राज्यस्तरीय समितीने सदर योजनेस मंजूरी दिलेली असुन ---- कोटीची योजना आहे.

**मा.श्री.निखिल वारे :-** सन २००९ साली ही योजना झाली परंतु आता पर्यंत या योजनेला निधी मिळू शकलेला नाही. पक्षिय मतभेद विसरुन या योजनेला गती देणे योग्य आहे.

**मा.श्री.गणेश भोसले :-** सारसनगर भागातील कोणत्या भागाचा समावेश करण्यांत आला.

**श्री.निकम मेकॅनिकल इंजिनियर :-** योजना राबविणे पुर्वी वर्कींग सव्हे करणे गरजेचे आहे.

**मा.श्री.निखिल वारे :-** या योजनेसाठी निधी कसा प्राप्त होणार आहे. याबाबत माहिती देण्यांत यावी.

**श्री.निकम मेकॅनिकल इंजिनियर :-** ८० % केंद्र शासन १० टक्के राज्य शासन १० टक्के महानगरपालिकेचा हिस्सा असेल.

**मा.श्री.निखिल वारे :-** महानगरपालिकेच्या १० टक्के निधीची तरतुद केली आहे काय.

**श्री.निकम मेकॅनिकल इंजिनियर :-** आजच्या महत्वाच्या विषयास महानगरपालिका सभेने मंजूरी दिल्यानंतर तरतुद करणार आहोत.

**मा.श्री.संग्राम जगताप :-** जुन्या शहरातील पाईपलाईनचा काय विषय आहे. नविन सर्व्हे केला आहे काय ? वर्किंग सर्व्हे मध्ये जुन्या शहर भागाचाही समावेश करणेंत यावा.

**श्री.निकम मेकॅनिकल इंजिनियर :-** नविन सर्व्हे करावा लागणार आहे.

**मा.आयुक्त साहेब :-** नविन स्कीम मध्ये दोन एसटीपी आहेत. जुनी व नविन दोन्ही योजना याच एसटीपी ला जोडणार आहोत. सुटलेला भाग वर्कींग सर्व्हे मध्ये समाविष्ट करणार आहोत. जुना एसटीपी अत्यंत जुना आहे. आता आधुनिक पध्दतीने काम होणार असुन प्रकल्पाची क्षमता वाढणार आहे.

**मा.श्री.विनीत पाअुलबुधे :-** संपुर्ण शहराचा विचार करण्यांत यावा. फेज-२ च्या कामाच्या वेळेस असे सांगण्यांत आले की, वर्किंग सर्व्हे सुरु होणार आहे. त्यावेळी अस्तित्वात असलेले भाग सोडुन दिले.आता काही कॉलनींचा समावेश करत आहोत. त्यामुळे प्रकल्पाचा खर्च वाढेल. दसरेनगर नित्यसेवा भाग २० वर्षापुर्वी वसलेला आहे. आता त्या भागाचा सर्व्हे करावयाचा आहे. त्यामुळे पाईपचा खर्च वाढणार आहे. शहराच्या नविन वाढ झालेल्या भागाचाही समावेश वर्किंग सर्व्हे मध्ये करण्यांत यावा.

**मा.श्री.संजय चोपडा :-** योजनेचा ३३ कोटी रुपये असलेला खर्च तिप्पट वाढलेला आहे. ताबडतोब राज्य शासनाकडुन मंजूरी घेवुन केंद्र शासनाकडे पाठवावा. केडगांव मधील नागरिक आजही दुषित पाण्याचा वापर करतात. माझे बँकेशी बोलणे झाले असुन ते यासाठी कर्ज उपलब्ध करुन देण्यांस तयार आहेत. एकमताने विषय मंजूर करावा. वर्किंग सर्व्हे करतांना जुन्या शहराचा विचार करण्यांत यावा.

**मा.श्री.संग्राम जगताप :-** सावेडी भुयारी गटार योजना तसेच केडगांव/सारसनगर भुयारी गटार योजना मंजूरी कामी मा.महापौर, मा.आयुक्त तसेच यंत्र अभियंता परिमल निकम यांनी केलेल्या प्रयत्नाबद्दल त्यांचे अभिनंदनाचा ठराव करावा तसेच याकामी केलेल्या सहकार्याबद्दल मी मा.शासनाचे आभार मानतो.

**मा.श्री.बाळासाहेब पवार :-** सावेडी भुयारी गटार योजना व केडगांव /सारसनगर भुयारी गटार योजना ज्वलंत प्रश्न आहेत. सावेडी भुयारी गटार योजना होणार-होणार या आशेवर नागरीक आहेत. ही योजना मार्गी लावलेबद्दल मी अभिनंदन करतो. मा.संदिप कोतकर यांच्या काळापासुन तीनही योजनांचे प्रस्ताव तयार करुन मंजूर झालेले आहेत. मा.संग्राम जगताप यांच्या काळात फेज-२ चे काम सुरु झालेले आहे. मा.महापौर शिलाताई शिंदे यांचेही ही योजना मार्गी लावणेसाठी प्रयत्न चालू आहेत मा.आयुक्त, मा.यंत्र अभियंता श्री.परिमल निकम या सर्वांचे अभिनंदन. या दोनही योजनांना आपण राज्य शासनाकडुन मंजूरी घेवुन केंद्र शासनाकडे मंजूरीसाठी पाठविणेकामी एकमताने मंजूरी द्यावी.

**मा.श्री.सचिन पारखी :-** डीपीआर करणेसाठी किती पैसे खर्च झाले याबाबत माहिती देण्यांत यावी. बंद पाईप वर खुप खर्च होतो एवढी मोठी योजना आपण राबवणार आहोत त्यादृष्टीने भविष्यामध्ये कामे करतांना नियोजन करावे.

**श्री.निकम मेकॅनिकल इंजिनियर :-** एकुण प्रकल्पाच्या ०.७८ टक्के शुल्क आहे.

---*---

**ठराव :-**

ऑफिस रिपोर्ट व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार ठरविण्यांत येते की, मा.केंद्रशासीत UIDSSMT योजनेअंतर्गत मंजूर असलेल्या १) सावेडी भुयारी गटार योजना, २) केडगांव / सारसनगर भुयारी गटार योजना या योजनेच्या सन २०१२-२०१३ चे दरसूची नुसार सादर करण्यांत आलेल्या प्रकल्प अहवालासह अंदाजपत्रक अनुक्रमे रक्कम रुपये १००.४९५ कोटी व रुपये ८२.२८७ कोटी खर्चास मान्यता देण्यांत येत असून या योजने अंतर्गत महानगरपालिकेचा हिस्सा म्हणून १०% रक्कम भरणेस मान्यता देण्यांत येत आहे. सदर योजना मार्गी लागतांना वर्कींग सर्व्हेनुसार अंदाजपत्रकीय रक्कम कमी जास्त झाल्यास त्यासही मान्यता देण्यांत येत आहे. १०% ची रक्कम अ थवा गरज पडल्यास लागणारी वाढीव रक्कम महानगरपालिका निधीतून अथवा कमीत कमी व्याजदर असणा-या वित्तीय संस्थेकडून कर्ज स्वरुपात उभारण्यांस मान्यता देण्यांत येत आहे. या व्यतिरिक्त मुळ शहराच्या गावठाण भागातील भुयारी गटार योजनेचा प्रकल्प अहवाल तयार करुन ती योजना राबविणेस ही सभा मान्यता देत आहे.

महानगरपालिका ठराव क्रमांक ५ दिनांक २१/०७/२००७ अन्वये पारीत ठरावानुसार मा.शासनाशी निगडीत व तसेच महानगरपालिका स्तरावरील सुधारणा राबविणेस ही सभा मान्यता देत आहे. नियमानुसार कार्यवाही करावी.

ऑफिस रिपोर्ट मंजूर खर्च मंजूर.

सुचक : मा.श्री.दिलीप नानाभाउ सातपुते.

अनुमोदक : मा.श्री. बाबासाहेब सोन्याबापू वाकळे.

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-<br>
महापौर,<br>
अहमदनगर महानगरपालिका.